RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# माराष्ट्रातील कृषी कामगारांची विभागनिहाय स्थिती

**प्रा. एस. एम. कोल्हापूरे,** सहाय्यक प्राध्यापक, विलिंग्डन महाविद्यालय, सांगली.

भारत हा कृषी प्रधान देश असून भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा कृषीक्षेत्र आहे. भारतीय लोकसंख्येच्या जवळपास 70 टक्के लोकसंख्या खेड्यांमध्ये राहते. त्यामुळे या लोकांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन कृषी व कृषीशी संबंधित व्यवसाय हेच आहे. त्याचप्रमाणे अनेक उद्योग जसे वस्त्रोद्योग, ज्यूट, साखर, तेल अशा उद्योगांना कच्च्या मालाचा पुरवठा करणारे क्षेत्र शेतीक्षेत्र आहे. तसेच उद्योग क्षेत्रातील उत्पादने जसे खते, कीटकनाशके, कृषी अवजारे यासारख्या वस्तूंना मागणी कृषी क्षेत्रातूनच केली जाते. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातील कृषी क्षेत्राचा हिस्सा कमी होत असला तरी त्याचे महत्व कमी होत नाही. 121 कोटी लोकसंख्येस अन्नधान्य पुरवठा करण्याचे कार्य कृषी क्षेत्र करते आणि निर्यातीमध्येही मोठे योगदान देते. देशाचा आर्थिक विकास कृषी क्षेत्राच्या विकासाशिवाय होणे अशक्यप्राय आहे. त्यामुळे प्रथम कृषीवर आधारित लोकांचा विकास होणे आवश्यक आहे. कृषीच्या उत्पादन वाढीमध्ये प्रामुख्याने शेतकरी व शेतमजूर या दोन घटकांचे योगदान महत्वाचे आहे. परंतु पूर्वीपासूनच हे दोन्ही घटक भारतीय नियोजनामध्ये उपेक्षित राहिले आहेत. शेती व शेतकरी यांच्या विकासासाठी नियोजनामध्ये काही धोरणे दिसून येतात. परंतु शेतीवर प्रत्यक्ष काम करणाऱ्या शेतमजूराच्या विकासासाठी कोणतेही धोरण दिसून येत नाही. 1948 मध्ये शासनाने किमान वेतन कायदा शेतमजूरांसाठीही लागू केला. परंतु या कायद्याची अंमलबजावनी शेतमजूरांच्या वेतन निश्चितीसाठी होत नसल्याचे दिसून येते.

भारताच्या कृषी व्यवस्थेमध्ये शेतमजूर हा घटक पूर्वीपासून दुर्लक्षित / उपेक्षित / वंचित /आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटक राहिलेला आहे. हा घटक उपजिविकेचे साधन म्हणून दुसऱ्याच्या शेतजमिनीमध्ये राबणारा आणि कृषी उत्पादनात प्रत्यक्षपणे भर टाकणारा महत्वाचा घटक आहे. परंतु हंगामी बेकारी, अल्प मोबदला, कमी उत्पन्न, राहणीमानाचा निकृष्ट दर्जा यामुळे हा घटक अजूनही आर्थिकदृष्ट्या खूपच कमकुवत आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टयेः**

प्रस्तुत शोधनिबंध पुढील उद्दिष्टांवर आधारित आहे.

1. शेतमजूर म्हणजे काय व त्यांचे प्रकार अभ्यासणे.
2. महाराष्ट्र राज्यातील विभागनिहाय शेतमजूरांचा अभ्यास करणे.
3. शेतमजूरांची आर्थिक स्थिती दयनीय असण्याची कारणे अभ्यासणे.
4. शेतमजूरांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उपाय सुचविणे.

**संशोधन प्रध्दतीः**

प्रस्तुत शोधनिबंध पूर्णतः द्वितीय साधनसामग्रीवर आधारित आहे. माहितीचे संकलन करण्यासाठी संदर्भ पुस्तके, विविध अहवाल, इंटरनेट इत्यादीचा उपयोग केला आहे. माहितीच्या विश्लेषणासाठी विविध सांख्यिकीय साधनांचा उपयोग केला आहे.

**शेतमजूर कोणाला म्हणावे?**

1. शेतमजूर दुसऱ्याच्या शेतजमिनीवर उपजीविकेचे साधन मिळविण्याच्या उद्देशाने काम करतो.
2. त्या जमिनीवर त्याची मालकी असत नाही.
3. शेतीसंबंधित कामाचे निर्णय तो स्वतः घेत नाही.
4. शेती व्यवसायात असलेली अनिश्चितता व जोखीम तो घेत नाही.
5. त्याला त्याच्या श्रमाबद्दल मिळणारा मोबदला फक्त मजूरीच्या स्वरूपात असतो. लाभाच्या स्वरूपात नाही.
6. जमीन मालकाकडून मिळणारा मोबदला वस्तू रूपात किंवा रोख स्वरूपात असू शकतो.

**शेतमजूरांचे प्रकारः**

शेतमजूरांचे शेतीच्या मालकीवरून, कामाच्या बांधिलकीवरून आणि लिंगभेदानुसार वेगवेगळे प्रकार पडतात ते पुढीप्रमाणे.

**अ) शेतीच्या मालकीवरूनः**

1. **भूमिधारी शेतमजूरः**

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

ज्या शेतमजूराजवळ स्वतःच्या मालकीची जमीन असते अशा शेतमजूरांना भूमिधारी शेतमजूर असे म्हणतात. अशा शेतमजूरांची शेतजमीन इतकी कमी असते की त्यांना त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी दुसऱ्याच्या जमीनीवर मजूरी करावी लागते.

2. **भूमिहीन शेतमजूरः**

जमिनीवर मालकी नसलेल्या व उपजिवीकेसाठी इतरांच्या जमिनीवर काम करणाऱ्या शेतमजूरांना भूमिहीन शेतमजूर असे म्हणतात.

**ब) कामाच्या कराराचे स्वरूपः**

1. **संबंधित शेतमजूरः**

जमीन मालकाकडे महिन्याचा किंवा वर्षाचा करार करून कामाला राहणाऱ्या शेतमजूराला संबंधित शेतमजूर म्हणतात. अशा शेतमजूरांना मिळणारा मोबदला इतर शेतमजूरांच्या तुलनेत कमी असतो, परंतु अशा मजूरांना कामाची शाश्वती वर्षभर असते.

2. **रोजमजूरी करणारे शेतमजूरः**

अशा प्रकारचे शेतमजूर दररोज मजूरीवर वेगवेगळ्या शेतकऱ्यांच्या शेतामध्ये काम करतात. दिवसभर केलेल्या कामाचा मोबदला ठरलेल्या दराने मिळतो. अशा शेतमजूरांचा मोबदला संबंधित शेतमजूरांच्या तुलनेत अधिक असला तरी यांना वर्षभर काम मिळण्याची शाश्वती असत नाही.

**क) लिंगभेदानुसारः**

1. **पुरूष शेतमजूरः**

शेतीमधील अंगमेहनतीची कामे करण्यासाठी पुरूष मजूरांची आवश्यकता असते. पुरूष शेतमजूरांना दिला जाणारा मोबदला स्त्री शेतमजूरांच्या तुलनेत अधिक असतो.

2. **स्त्री शेतमजूरः**

कमी अंगमेहनतीची कामे करण्यासाठी स्त्री शेतमजूरांना कामावर घेतले जाते. यांना दिला जाणारा मोबदला पुरूष शेतमजूरांच्या तुलनेत कमी असतो.

त्याचप्रमाणे ज्या शेतमजूरांचे वय 15 वर्षापेक्षा कमी आहे अशा मजूरांना जनावरांची राखण करणे व कमी परिश्रमाची कामे करवून घेण्यासाठी कामावर घेतले जाते. त्यास बाल–मजूर असे म्हणतात. शेतमजूरांकडून करून घेतल्या जाणाऱ्या कामाच्या प्रकारावरून व लिंगभेदानुसार मजूरीच्या दरामध्ये फरक दिसून येतो.

**महाराष्ट्रतील शेतमजूरांची विभागनिहाय स्थितीः**

महाराष्ट्र राज्य औद्योगिकदृष्ट्या विकसित असले तरी राज्यातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हाच आहे. राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी 233 लाख हेक्टर जमीन लागवडीखाली आहे. राज्याचे प्रशासकीय सुविधेसाठी कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर असे सहा विभाग करण्यात आले आहेत. राज्यातील विविध विभागातील एकूण मजूर, शेतमजूर व शेतमजूरांचे एकूण मजूरांशी असलेले प्रमाण पुढील तक्त्यामध्ये दर्शविले आहे.

**महाराष्ट्रतील शेतमजूरांची विभागनिहाय संख्या (लाखात)**

| विभाग | 1991 | | | 2001 | | | 2011 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण मजूर | कृषी मजूर | प्रमाण | एकूण मजूर | कृषी मजूर | प्रमाण | एकूण मजूर | कृषी मजूर | प्रमाण |
| कोकण | 76.87 | 12.87 | **16.74** | 97.27 | 6.77 | **6.96** | 116.46 | 8.71 | **7.48** |
| नाशिक | 57.44 | 21.25 | **36.99** | 69.55 | 23.49 | **33.77** | 85.60 | 30.94 | **36.14** |
| पुणे | 70.65 | 23.97 | **33.93** | 88.73 | 17.34 | **19.54** | 102.21 | 18.27 | **17.87** |
| औरंगाबाद | 57.76 | 21.78 | **37.71** | 66.52 | 23.02 | **34.61** | 84.68 | 29.64 | **35.00** |
| अमरावती | 38.35 | 10.11 | **26.36** | 43.34 | 21.36 | **46.10** | 51.50 | 27.10 | **52.62** |
| नगपूर | 40.06 | 11.72 | **29.26** | 46.33 | 16.17 | **34.90** | 53.82 | 20.21 | **37.55** |
| महाराष्ट्र | **341.13** | **101.70** | **29.81** | **411.74** | **108.55** | **26.36** | **494.27** | **134.87** | **27.29** |

Source: Register General and Census Commissioner, India.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की–

1. महाराष्ट्र राज्यामध्ये 1991 साली एकूण श्रमिकांची संख्या 341.13 लाख होती. यामध्ये वाढ होऊन ती 2011 मध्ये 494.27 लाख झाली.
2. राज्यामध्ये 1991 साली शेतीमध्ये काम करणाऱ्या श्रमिकांची एकूण संख्या 101.70 लाख होती. यामध्ये वाढ होऊन ती 2011 मध्ये 134.87 लाख झाली.
3. राज्यातील एकूण श्रमाच्या व कृषी मजूरांच्या संख्येमध्ये वाढ झाली असली तरी 1991 ते 2011 या कालावधीत एकूण मजूरांमध्ये कृषी मजूरांचे प्रमाण थोडेसे कमी झाले आहे. 1991 मध्ये हे प्रमाण 29.81 टक्के होते ते 2011 मध्ये 27.29 टक्के झाले.
4. 2011 च्या जनगणनेनुसार राज्यातील नाशिक विभागात कृषी मजूरांची संख्या सर्वाधिक असून कोकण विभागात सर्वात कमी आहे.
5. राज्यात 2011 च्या जनगणनेनुसार अमरावती विभागातील एकूण कामगारांमध्ये कृषी कामगारांचे प्रमाण सर्वाधिक असून या प्रमाणामध्ये 1991 च्या तुलनेत 2011 मध्ये जवळपास दुप्पटीने वाढ झाली आहे. हे प्रमाण कोकण विभागात सर्वात कमी आहे.

**शेतमजूरांची स्थिती दयनीय असण्याची कारणेः**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये व शेती व्यवस्थेमध्ये शेतमजूर पूर्वीपासून दुर्लक्षित घटक आहे. या घकाची आर्थिक स्थिती अतिशय दयनीय आहे. शेतमजूरांची आर्थिक स्थिती हालाखीची असण्याची काही कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

1. भारतीय शेती निसर्गावर अवलंबून असल्याने आणि पाणीपुरवठ्याच्या सोयींच्या अभावामुळे शेती हंगामी स्वरूपाची आहे. त्यामुळे शेतमजूरांना वर्षातून काहीच दिवस रोजगार मिळतो, तर इतर वेळी त्यांना बेकार राहावे लागते.
2. कामाचा अवधी, काम करण्याची परिस्थिती, कामाचे स्वरूप या बाबींचा विचार केल्यास शेतमजूरांना मिळणारा कामाचा मोबदला अल्प आहे.
3. शेतमजूरांना वर्षभर कामाची शाश्वती नसते. त्यामुळे त्यांना इतर उद्योगांमध्ये काम मिळविणे आवश्यक असते. परंतु ग्रामीण भागामध्ये लघु व कुटीरोद्योग मोठ्याप्रमाणात नसल्यामुळे त्यांना बिगरशेती व्यवसायात पुरेसा रोजगार उपलब्ध होऊ शकत नाही.
4. बहुसंख्य शेतमजूर अज्ञानी, निरक्षर असल्याने त्यांची सामाजिक व आर्थिक पिळवणूक होते.
5. भारतामध्ये शेतमजूरांची संख्या खूप असली तरी शेतमजूर खेड्यांमध्ये विखुरलेले आहेत. ते असंघटित आहेत, त्यामुळे त्यांची सौदाशक्ती कमी आहे.
6. शेतमजूरांना मिळणारा हंगामी रोजगार आणि मजूरीचा अल्प दर यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती कमकुवत आहे. परिणामी त्यांना सावकारांकडून जास्त व्याजदराने कर्ज घ्यावे लगते. त्यामुळे शेतमजूरांची अनेक कुटुंबे कर्जबाजारी आहेत.
7. शेतमजूरांच्या विकासासाठी भारत सरकारने कोणतेही वेगळे धोरण राबविलेले नाही. शेतमजूरांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी विशिष्ट योजना राबविलेल्या नाहीत.

वरील सर्व कारणांमुळे शेतमजूरांची आर्थिक स्थिती कमकुवत आहे. अलिकडील काळात शेतमजूरीच्या दरात वाढ झालेली असली तरी जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीच्या वाढीच्या तुलनेत ही वाढ नगण्य आहे. त्यामुळे शेतमजूरांचा जीवनमान दर्जा निकृष्ट आहे.

**शेतमजूरांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शासणाचे प्रयत्नः**

1. शासनाने इ. स. 1948 मध्ये किमान वेतन कायदा शेतमजूरांना सुध्दा लागू केला.
2. आचार्य विनोबा भावे यांनी 1951 मध्ये भूदान चळवळ भूमिहीन शेतमजूरांसाठी सुरू केली होती. या चळवळीचा मुख्य उद्देश जमीनदारांकडून जमीन घेऊन शेतमजूरांमध्ये वितरित करणे हा होता. या चळवळी अंतर्गत जवळपास 68 लाख एकर जमीन भूदान स्वरूपात जमा झाली. यापैकी 15 लाख एकर जमीन वितरित केली आहे.
3. भारतीय राज्यघटनेने शेतमजूरांची वेठबिगारी प्रथा बंद केली आहे. 24 ऑक्टोबर 1975 रोजी वेठबिगारी प्रथेचे उच्चाटन करणारा अध्यादेश राष्ट्रपतींनी जारी केला.
4. शेतमजूरांची हंगामी बेकारी कमी होण्यासाठी ग्रामीण उद्योगांच्या विकासासाठी शासनाचे प्रयत्न आहेत.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

5. ग्रामीण भागामध्ये रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनाने अनेक योजना राबविल्या आहेत. जसे रोजगार हमी योजना.

**शेतमजूरांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उपायः**

1. कृषी विकासावर भर देण्यात यावा जेणेकरून शेतमजूरांना वर्षभर रोजगार उपलब्ध होईल.
2. कुटीरोद्योगांचा विकास व विस्तार करण्यात यावा ज्यातून रोजगार निर्मिती होईल.
3. शेतमजूरांसाठी सहकारी समित्यांची स्थापना करण्यात यावी. ज्यामध्ये शेतमजूरांना रोजगार उपलब्ध होईल.
4. शेतमजूरांसाठी असलेल्या किमान वेतन कायद्याची अंमलबजावनी प्रभावीपणे करण्यात यावी.
5. शेतमजूरांच्या संघटना स्थापन करणे, ज्यामुळे त्यांच्या सौदाशक्तीत वाढ होईल.

थोडक्यात भारताच्या कृषी जीवनामध्ये दुर्लक्षित असलेला घटक शेतमजूर शेती उत्पादनात भर टाकणारा प्रमुख घटक आहे. हा घटक अजूनही आर्थिक विकासाच्या प्रवाहापासून वंचित आहे. शेतमजूरांची उन्नती करण्यासाठी शासनाने राष्ट्रीय पातळीवर शेतमजूर धोरण आखून त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे करणे आवश्यक आहे.

**संदर्भः**

1. Mamoria C. B. and Tripathi B. B. (2003), “Agricultural Problems of India”, Kitab Mahal, Allahabad.
2. Register General and Census Commissioner, India.
3. साळुंखे दत्ताजीराव आणि पवार जगन्नाथराव, (1982) ''महाराष्ट्राची कृषी अर्थव्यवस्था'', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
4. गुप्ता पी. के. (2011), ''कृषी अर्थशास्त्र'', वृंदा पब्लिकेशन, दिल्ली.
5. दयाशंकर सिंह यादव (मे, 2007), ''भारत में कृषक श्रमिक : उद्‌भव एवं विकास'', कुरूक्षेत्र, ग्रामीण विकास मंत्रालय, नई दिल्ली.